**मुंबई, दिनांक ११ मार्च २०१६**

मा. मंत्री (कृषि) यांनी केलेले निवेदन

**बी.टी. कापूस बियाण्यांचे दर निश्चिती**

**शेतक-यांच्या उत्पादन खर्चात घट**

मुंबई, दिनांक ११ मार्च - राज्य शासनाने महाराष्ट्रात बी.टी.कापूस बियांणांचे दर निश्चित केले असून त्यामुळे कापूस उत्पादक शेतक-यांच्या उत्पादन खर्चात आणखी घट होण्यास मदत होणार आहे.

**बीटी कापूस बियाणे महत्तम विकी किंमत तुलना**

| अ. क्र. | बियाणे प्रकार | महाराष्ट्र सरकारने निश्चित केलेले दर (दि.८.६.२०१५ पूर्वी दि.१७.८.२०१२ च्या अधिसूचने अन्वये ) | महाराष्ट्र सरकारने निश्चित केलेले दर (दि.८.६.२०१५ अन्वये) | भारत सरकारने निश्चित केलेले दर (दि.८.३.२०१६ अन्वये) |
|---|---|---|---|---|
| १ | बी.जी. - १ (४५० ग्रॅम बी.टी. + १२० ग्रॅम रेफयुजी | रु. ८३०/- प्रति पाकिट | रु. ७३०/- प्रति पाकिट | रु. ६३५/- प्रति पाकिट |
| २ | बी.जी. – २ (४५० ग्रॅम बी.टी. + १२० ग्रॅम रेफयुजी) | रु. ९३०/- प्रति पाकिट | रु. ८३०/- प्रति पाकिट | रु. ८००/- प्रति पाकिट |
| ३ | संकरित कापूस (नॉन बी.टी.) (४५० ग्रॅम बी.टी. ) | रु. ५००/- प्रति पाकिट | रु. ५००/- प्रति पाकिट | - |

महाराष्ट्रात बी. टी. कापूस पेरणी क्षेत्र साधारणत: ३८ लाख हेक्टर आहे. याकरिता सर्वसाधारण १.५ कोटी पाकीटे प्रविवर्षी विक्री होते. यापैकी बी. टी. कापूस बोलगार्ड-२ ची विक्री ९५ टक्के व उर्वरित बी. टी. कापूस बोलगार्ड- १ ची विक्री होते.

दिनांक ८ जून, २०१५ रोजी महाराष्ट्र शासनाने बी. टी. कापूस बोलगार्ड-१ चे दर रु.७३०/- प्रति पाकीट आणि बी. टी. कापूस बोलगार्ड-२ चे दर रु.८३०/- प्रति पाकीट असे निश्चित केले होते. दि. ०८ जून, २०१५ पूर्वी सदर दर बोलगार्ड-१ करीता रु. ८३०/- प्रति पाकीट आणि बी.टी.कापूस बोलगार्ड-२ करीता रु. ९३०/- प्रति पाकीट असे होते. अशा प्रकारे बी.टी. कापूस बियाणांचे दर प्रति पाकीट रु.१००/- नी कमी केले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात सुमारे रु. १५० कोटीची बचत झाली. सदर दर निश्चिती मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने वैध ठरवली होती.

तद्‌नंतर केंद्र शासनाने दिनांक ७ डिसेंबर २०१५ च्या अधिसूचनेन्वये संपूर्ण देशातील बी.टी.कापूस बियाणांचे दर निश्चित करण्याचे अधिकार केंद्र शासनास असल्याचे धोरण ठरविले. त्याअनुषंगाने केंद्र शासनाने दिनांक ८ मार्च, २०१६ रोजी संपूर्ण देशाकरीता बी.टी.कापूस बोलगार्ड-१ चे दर रु. ६३५/- प्रति पाकीट व बोलगार्ड-२ चे दर रु. ८००/- प्रति पाकीट असे निश्चित केले आहेत.

***********